दिनांक 15/01/2025 रोजीचा स्थायी प्रशासकिय ठराव क्र.161

मुख्याधिकारीसो, महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101 (1) अन्वये सन 2024-2025 चा सुधारित व सन 2025-2026 चा अनुमानित अर्थसंकल्प सादर करणेत आला.

## सन 2024 – 2025 चा सुधारीत अर्थसंकल्प

| | |
|---|---|
| आरंभिची शिल्लक | 7,65,97,358/- |
| सन 2024 – 2025 ची जमा | 62,35,22,319/- |
| शिलकेसह एकूण जमा | 70,01,19,677/- |
| सन 2024 – 2025 चा खर्च | 69,97,04,177/- |
| अखेर शिल्लक | 4,15,500/- |

## सन 2025 – 2026 चा अनुमाणित अर्थसंकल्प

| | |
|---|---|
| आरंभिची शिल्लक | 4,15,500/- |
| सन 2025 – 2026 ची जमा | 124,52,39,000/- |
| शिलकेसह एकूण जमा | 124,56,54,500/- |
| सन 2025 – 2026 चा खर्च | 124,51,98,000/- |
| अखेर शिल्लक | 4,56,500/- |

वरील अर्थसंकल्पास मंजूरी देत असून महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101 (3) अन्वये अंतीम मंजूरीसाठी प्रशासकिय कौन्सिल सभेकडे शिफारस करीत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 15/01/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 162

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील विविध ठिकाणी सामुदायिक / सार्वजनिक शौचालये / आकांक्षी सार्वजनिक शौचालय (CT/PT-APT) बांधकाम करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 15/01/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) मा.उपसचिव तथा राज्य अभियान संचालक सो स्व्च्छ महाराष्ट्र अभियान (ना.) यांचेकडील पत्र क्र.राअस/स्व्च्छ शौचालय / 835/2023-24 दि.05/12/2023.

विटा नगरपरिषदेची स्था पना दि.31/03/1854 साली झाली आहे. सदर ठिकाण जिल्हा व मुख्यालय पासून 52 कि.मी. अंतरावर आहे. 2011 च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या 48289 इतकी आहे. विटा शहर हे सांगली जिल्हयातील व्यापाराच्या दृष्टीने महत्वाचे शहर आहे. सांगली तसेच सातारा जिल्हयातील लोकांची व्यापारासाठी व शिक्षणासाठी विदयार्थ्यांची ये-जा असल्याने विटा शहर हे वर्दळीचे ठिकाण झाले आहे. त्यामुळे प्रशासनाकडून नागरीकांना योग्य त्या सोयी पुरविणे गरजेचे आहे.

संदर्भिय पत्रानुसार स्वच्छ भारत अभियान (नागरी) 2.0 अतंर्गत शहर स्वच्छता कृती आराखडयास अनुसरुन सामुदायिक / सार्वजनिक शौचालये / आकांक्षी सार्वजनिक शौचालय (CT/PT-APT) बांधकामासाठी निधी / अनुदान अनुज्ञेय आहे. स्वच्छ शौचालय अभियान अंतर्गत केंद्र शासनाने सन 2014 पुर्वी बांधकाम केलेले व सुस्थितीत नसलेले शौचालये निष्कासित करुन त्या जागेवर नविन शौचालय बांधकाम करण्यासाठी तसेच यापुर्वी बांधकाम केलेल्या शौचालयाची आवश्यकता असल्यास दुरुस्ती करण्यासाठी निधी अनुज्ञेय केलेला आहे.

तरी या अनुषंगाने विटा नगरपरिषद हद्दीतील शहरातील विविध ठिकाणी अस्तित्वातील शैचालयाची दुरूस्ती करणेकामी स्वच्छ भारत अभियान नागरी (2.0) योजनंअंतर्गत करणेत येणारी कामे खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील मारुती मंदिर जवळील शौचालय दुरुस्त करणे.
2. विटा नगरपरिषद हद्दीतील खानापूर रोड मार्केट यार्ड येथील शौचालय दुरुस्त करणे.
3. विटा नगरपरिषद हद्दीतील कराड रोड सावित्रीबाई फुले कॉम्प्लेक्स येथील शौचालय दुरुस्त करणे.
4. विटा नगरपरिषद हद्दीतील सागर सुलभ शौचालयाची दुरुस्ती करणे.
5. विटा नगरपरिषद हद्दीतील खानापूर रोड एस.टी.स्टॅण्ड जवळील शौचालय दुरुस्त करणे.

पान नं.2 वर

6. विटा नगरपरिषद हद्दीतील मिनी भाजी मार्केट येथील शौचालयाची दुरुस्ती करणे.
7. विटा नगरपरिषद हद्दीतील गोकुळ खानावळ जवळील शौचालयाची दुरुस्ती करणे.
8. विटा नगरपरिषद हद्दीतील आंबेडकरनगर मधील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे.
9. विटा नगरपरिषद हद्दीतील नेहरुनगर मधील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे.
10. विटा नगरपरिषद हद्दीतील पाटील गल्ली येथील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे.
11. विटा नगरपरिषद हद्दीतील भवानीमाळ येथील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे.
12. विटा नगरपरिषद हद्दीतील फुलेनगर येथील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे.
13. विटा नगरपरिषद हद्दीतील चांभारवेस येथील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे.
14. विटा नगरपरिषद हद्दीतील विवेकानंदनगर येथील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे.
15. विटा नगरपरिषद हद्दीतील कृष्णा हॉस्पीटल जवळील शौचालयाची दुरुस्ती करणे.
16. विटा नगरपरिषद हद्दीतील बिसूरकर गल्ली येथील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे.

तरी वरील कामांचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करणे, सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेणे व सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यता मिळणेकामी राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) यांचेकडे सादर करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा